Exh. C-2

# रत्नागिरी येथील मे. कामगार न्यायाधीश सो. यांचे कोर्टात

REFERENCE (IDA) NO.07 of 2022 CNR NO. MHLC080000852022

विभागीय वन अधिकारी,
सामाजिक वनीकरण विभाग, रत्नागिरी ------------- प्रथम पक्षकार

**विरुध्द**

शंकर सिताराम विभूते -------------- व्दितीय पक्षकार

प्रथम पक्षकार तर्फे एकतर्फा आदेश सेट असाईड करीता अर्ज

सदर कामी मे. न्यायालयाचे प्रथम पक्षकार यांचे विरुध्द दिनांक २९.०८.२०२३ रोजी एकतर्फा आदेश पारीत केला आहे. सदर आदेश रद्द होणेकरीता प्रथम पक्षकार यांचा विलंबाचे कारणासह मे. न्यायालय यांचेकडे सदरचा अर्ज सादर करण्यात येत आहे.

सदर अर्ज प्रथम पक्षकार त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्याकरीता दाखल करीत आहेत. प्रथम पक्षकार विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, रत्नागिरी यांचेकरीता प्राधिकृत सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण विभाग, रत्नागिरी पदसिध्द अधिकारी असून तत्कालीन वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र खेड यांचेकडे सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनीरकण विभाग, रत्नागिरी या पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. वनपरिक्षेत्रांतर्गत रोपवाटीका व रोपवनांची कामे यशस्वीपणे पार पाडणे तसेच सहाय्यक वनसंरक्षक पदाचा कार्यभार पाहताना रत्नागिरी विभागाअंतर्गत इतर ६ परिक्षेत्रांतर्गत रोपवाटीका व रोपवानाची कामे तपासणे ही कामे करावी लागत होती. तसेच या कार्यालयाअंतर्गत पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे कार्यालयीन कामकाजाचा अतिरिक्त ताण होता. असे क्षेत्रीय कामकाज व प्रशासकीय अडचणीमुळे प्रथम पक्षकार यांना मे. न्यायालया मध्ये उपस्थित राहणे शक्य झाले नव्हते. प्रथम पक्षकार यांनी मे. न्यायालयामध्ये नेमले तारखेला हजर न राहून आवश्यक ती कार्यवाही करणेसंदर्भात कोणताही हेतूत: निष्काळजीपणा केलेला नाही.

प्रस्तुत अर्ज हा परिपूर्ण स्वरुपाचा असल्यामुळे तो चालवून निकाली करणेचा मे. न्यायालयास हक्क, अधिकार आहे. सामनेवाला यांचेविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द न झालेस प्रस्तुत केसकामी प्रथम पक्षकार यांना त्यांची बाजू मांडता येणार नाही. व तसे झालेस त्यांचे विरुध्द निकाल होवून प्रथम पक्षकार यांचे पैशाच्या स्वरुपात भरून न निघणारे असे नुकसान होणारे आहे. तथापि प्रस्तुत आदेश रद्द केलेस तक्रारदार यांचे कोणतेही नुकसान होणारे नसून प्रकरण गुणदोषावर चालणेस मदतच होणार आहे.

तरी प्रथम पक्षकार यांची विनंती अशी की,

१. प्रथम पक्षकार यांचे विरुध्द दिनांक. २९.०८.२०२३ रोजी झालेला एकतर्फा आदेश रद्द करणेस विनंती आहे.
२. न्यायाचे दृष्टीने आवश्यक ते आदेश वेळोवेळी करणेत यावे.
३. प्रस्तुत अर्जात जरुर ती दुरस्ती करणेची परवानगी मिळावी.

येणेप्रमाणे अर्ज आहे.

दिनांक २५/११/२०२४

(अं. दि. तरडे)
सहाय्यक वनसंरक्षक,
सामाजिक वनीकरण विभाग ,रत्नागिरी
प्रथम पक्षकार विभागीय वन अधिकारी,
सामाजिक वनीकरण विभाग, रत्नागिरी तर्फे प्राधिकृत

O
otherside to say

JUDGE
Labour Court, Ratnagiri
27/11/2024

प्रा. मिळाली
29/10/2025

Scanned with OKEN Scanner

## प्रतिज्ञालेख

मी, श्रीम. अंकिता दिलीप तरडे, वय ३२ वर्षे, सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण विभाग, रत्नागिरी, जि. रत्नागिरी माझे धर्मास स्मरुन प्रतिज्ञेवर कथन करते की, वर लिहिलेला मजकूर माझे माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे.

दिनांक : २४/१०/२०२४

(अ. दि. तरडे)
सहाय्यक वनसंरक्षक,
सामाजिक वनीकरण विभाग, रत्नागिरी
प्रथम पक्षकार विभागीय वन अधिकारी,
सामाजिक वनीकरण विभाग, रत्नागिरी तर्फे प्राधिकृत

द्वितीय पक्षकार यांचे म्हणणे आहे की —

प्रथम पक्षकार यांनी जाणूनबुजून हेतूपुरस्सर या मे. न्यायालयाकडे अपील उशिराने दाखल केले आहे. द्वितीय पक्षकार हे आदिवासी असल्याने त्यांच्या अशिक्षितपणाचा फायदा प्रथम पक्षकारांनी घेतला आहे. या कालावधीत द्वितीय पक्षकार यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले आहे व जात आहे. तरी या मे. न्यायालयाला नम्र विनंती आहे की सदरचा अर्ज कॉस्टसहित फेटाळण्यात यावा.

सबबचे या जबानीत म्हणणे आहे. दि. २९/१०/२०२४

(ॲड. [illegible])
द्वितीय पक्षकारांचे वकील

O Read. Heard. perused record, In the interest of Justice allowed
29/10/2024